**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२९६/२०२३</u>**
**<u>शासन वि. जयवंत</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. पोलीस ठाणे अधिकारी पोलीस ठाणे देवणी यांनी दि.२९/१२/२०२३ रोजी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५–ई च्या गुन्ह्याकरिता आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे. त्यानंतर तत्कालीन न्यायदंडाधिकारी यांनी दि.१०/१२/२०२४ रोजी गुन्ह्याचे तपशील (नि.१०) निश्चित केला. अभियोग पक्षाने त्यानंतर एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली, परंतु ईतर साक्षीदारांना हजर केलेले नाही आणि त्यांची साक्ष नोंदविण्यास कसूर केला. सदर प्रकरण हे फार जुने आहे. सन्माननीय उच्च न्यायालयाने जुनी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत आदेशित केलेले आहे. सबब आरोपीला जलद गतीने प्रकरण चालविण्याचा आणि निकाली काढण्याबाबतचा अधिकार आहे. अभियोग पक्षाच्या कृतीमुळे आरोपीच्या मौलिक अधिकाराचे हनन होत आहे. सबब सदर प्रकरणाची स्थिती बघता अभियोग पक्षाचा पुरावा बंद करणे उचित ठरेल. यथास्थितीत अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात येतो आणि प्रकरण पुढे चालविण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.06.04 17:34:11 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – ०४–०६–२०२६**

**( शरद अ. सुरजुसे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**देवणी.**